0/C

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००

माहिती अधिकार

जावक क्र. :- 6399 दिनांक:- ११/१२/२५

---

## अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
## पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

१. अपिलार्थी
अॅड. विशाल पवार
वास्तुश्री सह.गृह.संस्था मर्यादित
सर्व्हे नं. ४३/२, कलश वास्तुश्री सोसायटी
उत्कर्ष सोसायटी लेन नं.-६, शेलारमळा
कात्रज पुणे-४६
संपर्क:- ९८९०७६११८७
२. श्रीमती राखी चौधरी
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

**अपिलार्थी अॅड. विशाल पवार**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता पुणे महानगरपालिका.**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी अॅड. विशाल पवार यांनी दि. ०७/१०/२०२५ रोजी उप अभियंता तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र.व दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| आ.क्र. ६८४८ दि. ०७.१०.२०२५ | ०७.११.२०२५ | जा.क्र. ५८२२ दि.२९.१०.२०२५ | - | - |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- ॲड. विशाल पवार यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांना दिनांक २९/१०/२०२५ अन्वये माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षास लेखी विचारणा केली असता त्यांनी RTI कायदा कलम 8.1g & 8.1.j नुसार आवश्यक कागदपत्रे सादर करून माहिती देण्याबाबत नकार दर्शविलामुळे, आपल्या कार्यालयाकडील आ.क्रं.७१६३ दि.१७/१०/२०२५ नुसार प्राप्त खुलासा व सादर केलेले कागदपत्रे अन्वये आपिलार्थी यांना माहिती अधिकार कायदा नुसार माहिती देण्यास नकार दिलेला आहे; अपिलार्थी यांना माहिती नाकारणे ही बाब अत्यंत चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी जाणून बुजुन RTI कायदा कलम 8.1 g & 8.1.j तरतुंदीचा उल्लघंन करून दिशाभूल करणारी माहिती पुरवल्यामुळे; अपिलदाराने प्रस्तुतचे अपिल दाखल केले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक |
| दि.२९.११.२०२५ | आ.क्र. ७७८० दि.१०.११.२०२५ | होय | - | जा.क्र. ६३७९ दि.१३.११.२०२५ |

**प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:-** २७.११.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता
**सुनावणीस अपिलकर्ता :-** उपस्थित
**सुनावणीस जन माहिती अधिकारी :-** उपस्थित

## विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे उपस्थित होते तसेच श्रीमती राखी चौधरी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता व संबंधित कनिष्ठ अभियंता स्थापत्य विभाग उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेकरिता केलेल्या अर्जातील माहिती हि त्रयस्थ पक्षासी संबंधित असून त्रयस्थ पक्षाच्या परवानगी शिवाय सदर माहिती देणे शक्य नसल्याचे कळविले होते. तसेच अपिलार्थी यांनी विचारणा केलेल्या माहितीने व्यापक जनहित साध्य होत नसून व त्रयस्थ पक्ष यांनी मागणी केलेनुसार अपिलार्थीस माहिती अधिकार २००५ अंतर्गत केलेल्या अर्जातील माहिती देणे शक्य नाही तदनुषंगाने अपिलार्थी यांनी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी कार्यालय पुणे महानगरपालिका यांचेमार्फत प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार (त्रयस्थ पक्ष) यांचेशी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत म्हणजेच तक्रारदारास मा. उप अभियंता तथा जनमाहिती अधिकारी (स्थापत्य विभाग) यांनी तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत मिळणेस विनंती केली आहे.

# आदेश

मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांनी आदेशित केलेनुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या मूळ अर्जात विचारणा केलेनुसार सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची विभागाकडे उपलब्ध माहिती अपिलार्थीस देणेत यावी.

सबब सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:- २७.११.२०२५
ठिकाण:-पुणे

टीप:- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.

२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.